Vol 3 Issue 11 May 2014 ISSN No :2231-5063

International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest,Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.net**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 2.2052(UIF)
Volume-3 | Issue-11 | May-2014
Available online at www.aygrt.isrj.net

GRT

# आंबेडकरवादापुढील आव्हाने – एक चिकित्सक दृष्टिक्षेप

*निलेश चंद्रकांत आढाव*

राज्यशास्त्र विभागप्रमुख, मुगुटराव साहेबराव काकडे महाविद्यालय, सोमेश्वरनगर, ता. बारामती जि. पुणे

***सारांश :-***डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांमुळे Inclusive Growth ही शक्य आहे. त्यांनी संपूर्ण भारतीय समाजाचा राजकीय, सामाजिक व तात्वीक पध्दतीने अभ्यास केलेला होता. भारतीय समाजाच्या आतापर्यंतच्या समस्यांची कारणे व त्यातले उपायांचे चिंतन त्यांनी आयुष्यभर केलेले होते.

त्यांचा सखोल विचार समजणे आवश्यक आहे. ते मोठे अवघडही आहे. त्यांचा विपर्यास होता कामा नये तो विचार काही इतर विचाराच्यांत अडकता कामा नये तरच खऱ्या अर्थाने Inclusive Growth होऊ शकते. अन्यथा नाही

मी माझ्या शोधनिबंधात संबंधित प्रश्नांची मांडणी केलेली आहे व त्यावर काही उपाय शोधता येतात का ते बघण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## *प्रस्तावना :*

प्रबोधनाच्या युगाला भारतात इंग्रजी शिक्षणामुळे प्रारंभ होऊ शकला इंग्रजी भाषेमुळे जगातील वैचारिक अभिसरणाच्या प्रक्रियेच्या भारतीय विचारवंतावर परिणाम होऊ शकला. भारतीय सामाजिक, राजकिय,व धार्मिक समस्या त्यामुळे उघडया झाल्या या समस्या स्पष्ट करण्यासाठी भारतीय विचारवंतानी अनेक पध्दतीने विचारमंथन केले. त्या विचाराची एकसंघपणे मांडणी केली तर एखाद्या विचारवंताकडून अंत्यत विचारसरणी व जीवनदृष्टी मिळते. पण त्या विचाराची एकसंघ पध्दतीने मांडणी व्हायला हवी. अशी विचारप्रणाली अनेक विद्याशाखामध्ये उपाययोजून अनेक नवीन सत्य प्रकाशात आणता येतात. याही पेक्षा अशी एकसंध विचार प्रवृत्ती मांडल्यास त्या विचाराचा दिवा हा भविश्यातील अनेक पिढयांना तात्विक चेतना देण्याचे साधन ठरते. प्रस्तृत लेखामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराच्या बाबतीत असे घडू शकले नाही याची दोन कारणे शोधण्याचा यथामती प्रयत्न केलेला आहे. सामाजिक विशमता ही केवळ हिंदू पुरती मर्यादित नाही. तर ही विशमता अन्य राष्ट्रात ही आहे. उच्च व कनिष्ठ अशा दोन विभागात समाजाचे विभाजन झाले असल्याचे डॉ. आंबेडकर प्रतिपादन करतात.

प्रत्येक गावगाडयात किंवा खेडयात जिथे अस्पृश्य लोक राहतात तेथे स्पृश्य वर्गाकडून एकसहितां तयार केली होती. या सहितेचा भंग करणे हा एक गंभीर अपराध मानला जायचा अस्पृश्यांना साधे माणुसकीचे हक्क मिळू दिले नाहीत. हिंदूकडे सद्सदविवेकबृध्दी का नव्हती.

डॉ. आंबेडकरांच्या मते या प्रश्नाचे उत्तर एकच आहे. ते म्हणजे अस्पृश्यतेचे मूळ हे हिंदू धर्मात आहे.

## *अस्पृश्यता :*

भारताप्रमाणे इतर राष्ट्रात असलेली सामाजिक विषमता नष्ट झाली. कारण ती सामाजिक विषमता सामाजिक आणि आर्थिक कारणामुळे निर्माण झाली होती. त्या राष्ट्रातील धर्मांनी कधीही सामाजिक विशमतेला मान्यता दिली नव्हती परंतु भारतातील अस्पृश्यतता अजूनही टिकून आहे. कारण हिंदू धर्मानेच अस्पृश्यता निर्माण केली. थोडक्यात डॉ. आंबेडकर असा निष्कर्ष मांडतात की, '' हिंदू धर्म व त्याची शिकवण हीच अस्पृश्याच्या अधोगतीस जबाबदार आहे.''

## *अस्पृश्यता एक सामाजिक समस्या :*

भारतीय समाज व्यवस्थेत अंतर्भूत असलेली अस्पृश्यता ही एक सामाजिक समस्या आहे याचा आतापर्यंत कोणी विचारच केला नव्हता उलट अस्पृश्यता पाळणे म्हणजे धर्मानुसार आचरण करणे असेच मानले जात होते. अस्पृश्यता ही हिंदू धर्मातील एक धर्म मान्य रुढी आहे. असाचा लोकांचा समज होता. डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यतेच्या प्रश्नाचा अभ्यास करुन अस्पृश्यता ही भारतीय समाजात फार मोठी समस्या आहे असे प्रतिपादन केले.

अस्पृश्यता ही मुक्त नसलेली बंदिस्त समाजव्यवस्था आहे. अस्पृश्यता बंधनाकारक होती. अस्पृश्यता अप्रत्यक्ष गुलामी असून गुलामीपेक्षाही तो सर्वात वाईट प्रकार आहे. माणसाचे स्वातंत्र सर्वांना समोर प्रत्यक्षपणे हिंसकावून घेणे हा गुलाम करण्याचा गृहित मार्ग आहे त्यामुळे गुलाम हा त्यांच्या गुलामगिरीबद्दल जागरुक राहतो. आणि त्यातून मुक्त होण्यासाठी महत्वाचे पाऊल टाकू शकतो परंतु जर एखादयाचे स्वातंत्र्य तर अप्रत्यक्षरीत्या हिरावून घेतले तर त्याला आपण गुलामीत आहे याची जाणीव राहत नाही.

डॉ. आंबेडकर स्पष्टपणे प्रतिपादन करतात की, अस्पृश्यता ही प्रत्यक्ष गुलामगिरीचा प्रकार आहे. अस्पृश्यांना त्यांच्या गुलामगिरीची जाणीव करुन न देता लादलेली गुलामगिरी होय. ती अस्पृश्यता असून शिवाय गुलामगिरी आहे. अस्पृश्यता ही गुलामगिरीच्या तुलनेत अतिशय रानटी व क्रूर आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मते ''अस्पृश्यांचे अधःपतन होण्याचे कारण म्हणजे हिंदू समाजाने अस्पृश्यांना माणूस म्हणून वागविले नाही. अस्पृश्य म्हणजे जो अस्वच्छ आहे जो मैत्रीस अपात्र आहे व व्यवहारास अपात्र आहे अशी त्याला वागणुक देण्यात आली''.

अस्पृश्यांचा प्रश्न किंवा अस्पृश्यांची समस्या गंभीर स्वरुपाची असल्याची डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जाणीव होती. जीवनातील असे एकही क्षेत्र नाही की जिथे हिंदू व अस्पृश्यांमध्ये स्पर्धा होत नाही. मानसशास्त्रीयदृष्टया जात व अस्पृश्यता ही अविभाज्य असून ती एकाच तत्वावर अधिश्ठित आहे. हिंदूची जातीवर श्रध्दा असल्यामुळे ते अस्पृश्यता पाळतात. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की अस्पृश्यता नष्ट करणे म्हणजे जाती व्यवस्था नष्ट करणे होय. जाती व्यवस्थेवर आघात न करता अस्पृश्यता नष्ट होऊ शकत नाही.

एकसंघ स्वरुपात आंबेडकरवाद म्हणजे काय?हे आज सहज सांगता येत नाही त्यांची अनेक वाक्य व प्रमेये सांगता येतात. पण एक इसम म्हणून बाबासाहेबांच्या विचारांचा गुणधर्माचा शास्त्रीय व पध्दतशीर अभ्यास केलेला दिसत नाही. त्यांची विविध क्षेत्रातील विचारावर निश्कर्श मांडण्याची पध्दती व स्वातंत्र्य, समता व बंधूता या अहिंसेच्या मार्गाने केलेला पुरस्कार त्यासाठी आधार गृहीत तत्वे यांची एकत्रीत मांडणी करुन आजतागायत आंबेडकर वाद म्हणून त्यांच्या विचारवरांची होऊ शकली नाही ही मुख्य समस्या आहे. असे का झाले त्यांचे कारण म्हणजे आंबेडकरी विचाराची मांडणी ही मार्क्सवादी व बुध्दवादी चौकटीतून होत राहीली. परिणामतः मार्क्सवाद व बुध्दवाद हेच आबेंडकर वाद आहे काय असे चित्र निर्माण होउन ते आंबेडकरवादापुढचे आव्हान ठरते. आंबेडकरवाद विकसित करायचा या आव्हानामुळे राहून कसा गेला हे पुढे सकक्षेपाने नमुद केले आहे.

***मार्क्सवादी चौकटीत आंबेडकरवादः–***

जगातील सर्व समाजसुधारक एका समान तत्वाला अनुसरणारे असतात. ते म्हणजे जग बदलासाठी तत्वचिंतन या बाबतीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर व कार्ल मार्क्स यांच्यातही समानता आहेच. असे असले तरी आंबेडकरीवादाचा गाभा मार्क्सवाद आहे असे अजिबात नाही. अभ्यासकांनी अनेकदा मार्क्सवादाच्या प्रमेयाची आंबेडकरीवादाच्या प्रमेयाशी समानता दाखवण्याचे प्रयत्न केलेले आहेत. बऱ्याचदा बाबासाहेबांचे विचार हे मार्क्सचेच विचार असल्याचा रिडक्सनिष्ठ प्रयत्नही केलेले आहेत. कदाचित अभ्यास म्हणून यात काही गैर नसेलही परंतु या सर्व परिश्रमामध्ये आंबेडकरवादाची ओळखच स्पष्ट होऊ शकली नाही किंबहूना आंबेडकरवाद मांडायचा अभ्यासकाकडून राहूनच गेला व त्यावर एका अर्थाने मार्क्सवादाचे आवरण नकळत आले. दमण व शोशण यांच्यावर आघात करणाऱ्या मार्क्सवादी व आंबेडकरवादी चळवळीनां कदाचित एकत्रित ताकद उभी करण्यास त्यांची थोडीफार मदत झाली असेल परंतु जगाला आंबेडकरवाद म्हणजे काय?आहे हे सांगताना आपण त्यामुळे अपुरे पडतो.

मुळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीच बुध्द की कार्ल मॉर्क्स या त्यांच्या लेखात मार्क्सचा समाचार घेउन त्यांची त्यांना स्वतः वाटणारी निरुउपयोगिता दाखवून त्यांचे टाकाउ पण सिध्द केलेले आहे. तेथेच मार्क्स व आंबेडकर यांच्यातील सर्व तुलनामधील फोलता सिध्द होते. वैज्ञानिक बांधिलकी मुळे मार्क्सचे चिंतन डमबींदपेजपब घेऊन त्यातून माणूस हरवला असे बाबासाहेबांना वाटते.

समाज जीवन हे केवळ आर्थिक मूल्यांचाच परिपाक नसून तो स्वातंत्र्य, समता व बंधुता यांनी विकसित होत राहतो. ही बाबासाहेबाची भुमिका मार्क्सवादाला थेट छेद देते. परंतु मार्क्स व आंबेडकर यांची तुलना करताना या दोघाच्यां मुलभूत आधार विधानाचा परस्पर विरोधाचा अर्थ लक्षात घेतला जात नाही. व केवळच तुलनेची घाई होते. या तुलनामध्ये जाती म्हणजे भारतीय वर्ग अशी प्रमेय मांडली गेली. त्यामुळे आंबेडकर प्रणीत जातीअंताचा लढा म्हणजेच मार्क्सप्रणित वर्गभेदाचा अंत असे काही जण प्रतिपादित करु लागले.(आता या बाबत बऱ्यापैकी जागृती झालेली दिसते). पण बाबासाहेबांनी केलेले जातीचे मानववंश शास्त्रीय विश्लेषण त्यांची पध्दती जातीनां वर्ग का म्हणता येत नाही. याचे त्यांचे स्वतःचे विवेचन बाजूला सारले गेले. याचा दूरगामी परिणाम म्हणजे नंतरच्या वाचकामध्ये जात ही वर्गाशी समानच आहे काय असा वैचारिक गोधंळ निर्माण राहू शकतो.

तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांना खेडे सोडण्यासाठी सांगितले. याचेही मॉर्क्सवादी अर्थ लावला जातो. व उत्पादन संबधच संपविले तर पिळवणूक थांबते. तसे खेडयातील उत्पादन संबधच संपुष्टात येण्यासाठी 'खेड सोडा' हा बाबासाहेबाचा मॉर्क्सवादाच्या प्रमेयाशी मिळता जुळता वाटतो पण असे करत असताना बाबासाहेबांनी ग्रामीण संरजामी व्यवस्थेची केलेली टिका कायमची बाजूला जाण्याचा धोका निर्माण होतो. परिणामतः बाबासाहेबांच्या चिंतना पेक्षा वेगळेच चिंतन पुढे येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अर्थिक मुल्यांपेक्षा मानवी मुल्ये महत्वाची वाटत होती. त्यांचा समाज मोठा अभाव आहे व तो अहिंसक मार्गाने मांडला जावा अशीच त्यांची धारणा होती. मार्क्सवाद समानता प्रस्थापित करतो. पण ती समानता स्वतंत्र व बधूंता यांचे बलिदान देते. समानतेचे इतके भयंकर मुल्य मोजायला आंबेडकर कदापि तयार नाहीत. अशी समानताही एक प्रकारची हुकुमशाहीच असते. असे त्यांचे मत आहे. वरील प्रकारच्या तुलनामुळे मार्क्सवादात आंबेडकर वाद अनुस्तुत असे चित्र निर्माण होते व त्याचमुळे आंबेडकरवाद हा पध्दतशीरपणे मागे राहतो. आंबेडकर आश्रित विचार परिस्थतीनुरुप बदलणारे विचार यांची एक संघमांडणी त्यामुळे होत नाही.यांचा सामाजिक, राजकीय पातळीवर वेगळे परिणाम होतात. बाबासाहेबांनी आत्मबल दिलेल्या दलित समाजातील संघर्ष करण्याची ताकद अनन्यसाधरण आहे ती ताकद अनन्यसाधरण आहे. ती ताकद मार्क्सवादी त्यांच्या राजकीय उद्दिष्टासाठी वापरुन घेऊ शकतो आंबेडकरांना न्यायी मार्गाने संपत्ती वागविणे व्यक्ती साठी मान्य आहे. मार्क्सवाद दलित चळवळीचे नेतृत्व करु लागेल वास्तवात आंबेडकर वादाने केवळ दलितांचे नव्हे तर तेथील सर्वच उपेक्षित घटकांचे अगदीच शेतकऱ्याचेही नेतृत्व करण्याचे नेतृत्व करण्यांचे

सामर्थ्य सिध्द केले पाहिजे. हे तेव्हाच शक्य आहे जेव्हा आंबेडकर वादी विचार प्रणाली म्हणून विकसित केले जाउ शकते याचसाठी सुरवातीच्या टप्यावर 'इनहॅलिशन ऑफ कास्ट' मध्ये लिहताना त्यांनी राजकीय सुधारकांच्या अगोदर सामाजिक सुधारणा कराव्यात याचा आग्रह धरला बाबासाहेबांनी विशेश्यतत्वांने दलित प्रश्न मांडले असले तरी देखील सामान्यतः सर्व भारतीय समाजाच्या वेदनांचा ऊहापोह त्यांनी केलेला आहे. पण त्या सर्व सामाजिक घटकांना आंबेडकरवाद म्हणजे काय हे माहित नसल्यामुळे वेदनांचे उपाय जे आंबेडकरवादात आहेत ते सापडत नाहीत अशा रीतीने मार्क्सवाद विचारसरणीचे अभ्यासक एकतर मार्क्सवाद चौकट आंबेडकरवाद मांडण्यासाठी वापरतात. त्यामुळे आंबेडकरवाद दुय्यमतर ठरला जातो. पण त्याहून महत्वाचे म्हणजे नेमका आंबेडकरवाद म्हणजे काय हा प्रश्न अनुतरीत राहतो मुळात जगातील अभ्यासकांनी मार्क्सवादी हा मार्क्सच्या अनेक विध लिखाणातून अभ्यासून एक विचारसरणी म्हणून विकसित केला तसा भारतीय अभ्यासकांनी आंबेडकरवाद विकसित करण्याकडे कधीच लक्ष केंद्रीत केलेले दिसत नाही. आंबेडकर वाद जोपर्यंत एकसंगम मांडला जात नाही. तोपर्यंत त्यांचे मार्क्सवादाशी तुलना देखील अपूर्णच राहते. पण अशा तुलनेलाच आंबेडकरवादांच्या प्रस्थापनेतील मोठा अडसर ठरतात. या अर्थाने मॉर्क्सवाद हे आंबेडकरवादांच्या मांडणीसमोरील एक आव्हान ठरते.

### *बुध्दवादी चौकटीतील आंबेडकरवादः–*

आंबेडकरवादाची एक विचारसरणी म्हणून विकास करण्याच्या प्रक्रियेतील दुसरा मोठा अडथळा म्हणजे बौध्द धर्माला प्राथमिक समजून आंबेडकरांच्या विचारांची होत असलेली मांडणी सर्वात प्रथम हे लक्षात ठेवले पाहिजे. की, 'बाबासाहेबांनी धर्म नव्हे धम्म स्विकारलेला होता'. बाबासाहेबांना अपेक्षित असलेली समता स्वतंत्र व बंधुता ही भारतीय समाजास अभावाने असण्याचे कारणच येथील धर्म होता. धर्मातील त्या कारणीभूत असणारे गलिच्छ अंगे काढून आधुनिक सुखी मानवांच्या संकल्पनेला जन्म देणारा व 'सम्यकनितीचा संदेश देणारा धम्म' त्यांनी स्विकारला.

समाजाची व तेथील अप्रचलित विचार सरणीची अनेक अंगाने चिकीत्सा करुन बाबासाहेबांनी शेवटी हा धम्म स्विकारावासा वाटला परंतु त्यांच्या सुरवातीच्या इतर सर्वच विचारांना तिलाजंली देवून केवळ बुध्द धर्म सांगणे म्हणजे आंबेडकरांचे विचार आहेत असे चित्र काही प्रमाणात दिसत आहे. सामाजीक सुधारणाचा गाभा हा धार्मिक सुधारणांमध्ये असल्यामुळे सुधारीत धर्म ही समाज विकासाची पूर्व अट ठरते. असे बाबासाहेबांना वाटत असे. नवीन धम्माच्या आधारे दलित समाजाला जुनी जोखडे त्यागून नवीन सामाजिक स्थान मिळेल अशी अपेक्षा त्यामागे होती. बुध्दवादातील अहिंसा स्वतंत्र्य, समता व बंधुता ही अध्यात्मिक मूल्य असल्याचे त्यांचे म्हणणे होते. धम्माची जर धर्माप्रमाणेच नवीन व्यवस्था निर्माण झाली तर त्यातील समानता व स्वतंत्र्य यांना दुय्यम दर्जा प्रस्तापित होउन बौध्दाची नवीन उभी सामाजिक विभागणी निर्माण होऊन पुन्हा शोशणाला उजळणी मिळू शकते तसेच बुध्दवाद हा भारतीय समाजात एकेकाळी लोप पावण्याचे एक कारण म्हणजे त्यांचा नंतर फोफावलेला अतिरेकी संन्यासवाद आजही आंबेडकरी विचारांचे संन्यासवादी आकलन होताना दिसते. आंबेडकरवादाला धम्माच्या आध्यात्मिक मुल्यांचे वावडे नसले तरी त्यांनी थेट संन्यासाची शिफारस कितपत केलेली आहे. यांची चिकीत्सा झाली पाहिजे. आंबेडकर वाद हा लोकशाहीची मांडणी उदारमत वादाच्या आधारवाद करतो. हे आंबेडकरवादाचे तत्व बुध्दवादाच्या मांडणीमध्ये बाजूला राहते.

आंबेडकर वादाच्या व्यापक चौकटीत बुध्दवादाची (धम्म) मांडणी व्हायला हवी. बुध्दवाद हा मोठा प्रंपच आहे. त्यात बाबासाहेबांनी निवडक गोश्टीना स्थान दिले आहे. समाजाचे उत्थान हे प्रत्येक व्यक्तीच्या उत्थानांच्या साहयाने करणे हे आंबेडकर वादाचे ध्येय दिसते. व्यापक बुध्दवाद हा निर्वाण संकल्पनेला अंतिक ध्येय मांडतात. हा गुंता सोडविण्यासाठी आंबेडकरप्रणीत इहवाद वा भौतिकवाद यांची मांडणी होणे गरजेचे आहे. परंतु असे न घडता धार्मिक रितीरिवाज फोफावू लागले आहेत. संन्यासाचे आकर्शण नवबौध्दामध्ये वर येत आहेत. पुढे त्यात होत गेली तर आंबेडकर वाद हा नवबौध्द वाद न राहता संन्यासवादातच झाकाळलेला जाण्याचा धोका संभावतो. बुध्द धम्माच्या वृध्दीमुळे आंबेडकरांचे विचार दुय्यम होतात व परिणामतः त्यांचे खरे स्वरुप झाकले जाते.

बाबासाहेबांनी अस्मिता स्वहिंमतीवर मिळविण्याचा मार्ग सांगितला त्या मार्गाचा बिजमंत्र म्हणजे 'शिका संघटित व्हा व संघर्ष करा' हा होय. त्यांना नव अस्मिता ही अध्यात्मातच शोधायची असली असती तर त्यांनी आत्मगमन व्हा संयम सोडा असे सांगितले असते कारण ती प्रचलित आध्यात्म शास्त्रातील पूर्व अट आहे. या गोष्टीचा विचार फारसा होत नाही असे दिसते. बाबासाहेब भौतिकवाद यहवाद यांच्या आधारे दलितांना हिरावून घेतलेली अस्मिता परत मिळविण्यासाठी स्वतंत्र, समता व बंधुता यांचा संदेश देणारा धम्म केवळच दलितोध्दाराचा जाहीरनामा मांडत नाही. तर भारतीय समाज व्यवस्थेने नागावलेल्या प्रत्येक जीवास नवचैतन्य देणारा आहे. बाबासाहेबांनी दलितांना त्यांचे अत्याचार वास्तवाची जाणीव करुन दिली. जशा बुध्दाने मानवी दुःख या वास्तवाची जाणीव करुन दिली. बाबासाहेबांनी अत्याचारातून बाहेर पडण्याचा सम्यक मार्ग दाखविला असे बुध्दांने मानवाला दुःखातून बाहेर पडण्याचा मार्ग दाखविला आहे.

बुध्दवादाच्या आधारे बाबासाहेबांचे विचार समजावून घेत असताना सामजिक, राजकीय पातळीवर नवचैतन्य संचारलेल्या दलित समाजाची ताकद हा बुध्द धर्म प्रसारातच वापरली जाण्याचा धोका निर्माण होउ शकतो. त्यातून पुन्हा धर्मअंतर्गत व्यक्तीची उभी विभागणी होउन बाबासाहेबांना नको असलेल्याच गोश्टी प्रस्तापित होतील. वास्तवात बाबासाहेब मार्क्सची संमिक्षा करुन त्यांच्या मर्यादा दाखवितात सर्व धर्माची संमीक्षा करुन बुध्दवादातील समानता व अहिंसेच्या तत्वाच्या आधारे आपला नवीन बौध्द धर्म सांगतात. हे त्यांच्या व्यापक विचारांच्या अनेक आयामांपैकी दोन आयाम ठरतात. पण सर्व आयांमाचे सशोधन होउन त्यांची एकत्रित मांडणी व्हावयाला हवी. एवढेच या लेखाद्वारे स्पष्ट करावयाचे आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतः बालपणापासून जातीयतेचे दाहक अनुभव घेतले होते. शिक्षण घेत असताना सुध्दा वाईट अनुभव आलेले होते. त्यामुळे जातीव्यवस्थेमध्ये संपूर्ण समाज भरडला गेला होता. जातीव्यवस्था ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र अशा चार वर्गात विभागला होता. त्यामुळे अस्पृश्यता आणि जाती व्यवस्था निमुर्लनासाठी प्रयत्न केले. म्हणूनच पुढील काळात भारतीय संविधनात डॉ. आंबेडकर व मसुद्या समितीतील तज्ज्ञं सदस्यांनी संपूर्ण भारतातील जनतेला ' एक व्यक्ति एक मत एक मुल्य' या समान धाग्यात सर्वाना आणले.

***संदर्भ सूची :***

1.डॉ. कसबे रावसाहेब, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना', सुगावा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे 30.
2.कांबळे उत्तम (संपादक) – झोत–सामजिक न्यायावर, सुगावा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे 30.
3.कीर धनंजय, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, चौथी आवृत्ती, 2006
4.फडके य. दि., 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि काळाराम मंदिर सत्याग्रह' सुगावा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे 30, द्वितीय आवृत्ती 14 एप्रिल, 2008
5.'डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाशणे, खंड, 18 भाग 1 1920 ते 1936, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, 2002
6चव्हाण दिलीप, शिक्षण – जातीवर्गीय वास्तव आणि समतावादी पर्याय, क्रांतीसिंह नानापाटील अकादमी, 1999
7.संत ज. गो. (संपादक)– माझी आत्मकथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर, विनिमय प्रकाशन, मुंबई दहावी आवृत्ती, एप्रिल, 2012



*निलेश चंद्रकांत आढाव*
राज्यशास्त्र विभागप्रमुख, मुगुटराव साहेबराव काकडे महाविद्यालय, सोमेश्वरनगर, ता. बारामती जि. पुणे

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,
We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.net